# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-४११००४

**परिपत्रक क्रमांक रा.मं/पापुअ/पापुई/संशोधन/इ.९वी पुनर्रचित अभ्यासक्रम/ विषययोजना,तासिका नियोजन व मूल्यमापन योजना/३९६०, दिनांक-२८/७/२०१७**

या परिपत्रकान्वये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाशी संलग्न सर्व माध्यमिक शाळाप्रमुखांना कळविण्यात येते की, इ.९वी भाषा विषयांची कृतिपत्रिकांद्वारे मूल्यमापन योजना सुरु केली आहे. भाषा विषय तसेच NCF- 2005 व SCF- 2010 च्या अनुषंगाने सर्वच विषयांचा अभ्यासक्रम पुनर्रचित करुन विषय योजना तसेच मूल्यमापन योजनेत बदल करण्यात आलेले आहेत. त्या अनुषंगाने पाठयपुस्तके तयार करण्यात आलेली आहेत. त्यांची अंमलबजावणी इ.९वी साठी शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून सुरु होत आहे. इ.९वी-१०वी साठी प्रथमच अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तके याबाबत एस.सी.ई.आर.टी. (विद्याप्राधिकरण) व महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती)पुणे यांचेमार्फत कार्यवाही होत आहे. अभ्यासक्रम पुनर्रचनेच्या अनुषंगाने विषय रचनेत देखील खालील प्रमाणे बदल करण्यात आलेले आहेत.

अ) इयत्ता ९ वी साठी **'माहिती संप्रेषण तंत्रज्ञान'(आय.सी.टी)** हा विषय स्वतंत्र न राहता आय.सी.टी. चा समावेश सर्व विषयांमधून करण्यात आलेला आहे. त्यामुळे त्याचे स्वतंत्र पाठयपुस्तक असणार नाही.

ब) इ.९वी साठी गणित या विषयास **''सामान्य गणित''** हा विषय पर्याय राहाणार नाही. सर्वांसाठी गणित भाग-१ व भाग-२ (बीजगणित व भूमिती) हीच पाठ्यपुस्तके राहतील.

क) सामाजिकशास्त्रे विषयांतर्गत भूगोल विषयाबरोबर अर्थशास्त्र हा स्वतंत्र विषय न राहता भूगोल व गणित या दोन्ही विषयांत अर्थशास्त्र विषयक क्षमता व आशय यांचा समावेश केलेला आहे.

ड) शालेय प्रमाणपत्र व श्रेणी विषयाची पुनर्रचना व विषयात बदल केलेले आहेत. व्यक्तिमत्त्व विकास, कार्यानुभव, समाजसेवा व व्यवसाय मार्गदर्शन या विषयांऐवजी **''स्व-विकास व कलारसास्वाद''**या आशयाचा एक विषय राहील.

इ) शालेय प्रमाणपत्र विषयात संरक्षणशास्त्र हा विषय राहील. त्यास पूर्वीप्रमाणे एम.सी.सी. (फक्त ९वी) स्काउट गाईड, नागरी संरक्षण व वाहतूक सुरक्षा व एन.सी.सी. हे विषय पर्याय म्हणून राहतील.

ई) शिक्षण व्यवसायाभिमुख व्हावे या दृष्टीने ''राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान'' (RMSA) अंतर्गत ''National Skill Qualification Framework'' (NSQF) चे इ.९वी-१०वी स्तरावर एकूण १० विषय सुरु करण्यात आलेले असून, हे विषय शासन आदेशानुसार इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांना तृतीय भाषा अथवा सामाजिकशास्त्रे या विषयास पर्याय म्हणून तर इंग्रजी व्यतिरिक्त इतर उर्वरित माध्यमाच्या विद्यार्थ्यांना द्वितीय भाषा अथवा सामाजिकशास्त्रे या विषयास पर्याय म्हणून निवडता येतील. **सदर विषय राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान यांनी ज्या निवडक शाळांना NSQF चे विषय सुरु करण्यास परवानगी दिलेली आहे त्यांनाच विषय सुरु करता येतील याची नोंद घ्यावी.**

**प्रचलित पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम (V1,V2,V3) यास ''Pandit Sundarlal Sharma Central Institute Of Vocational Education, Bhopal'' (PSSCIVE) यांची मान्यता असल्याने व त्यास शालेय शिक्षण विभागाने मान्यता दिलेली असल्याने ''नॅशनल स्किल क्वालिफिकेशन फ्रेमवर्क'' (NSQF) च्या विषयाप्रमाणेच वरील प्रमाणेच भाषा व सामाजिकशास्त्रे या विषयास पर्याय म्हणून अभ्यासता येतील. परंतु हे विषय घेण्यास व्यवसाय शिक्षण संचालनालयाने ज्या शाळांना मान्यता दिलेली आहे त्याच शाळांना हे विषय निवडता येतील. याची अंमलबजावणी इ.९वी साठी शैक्षणिक वर्ष २०१७-१८ व इ.१०वी साठी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून होईल, याची नोंद घ्यावी.**

१) **भाषा विषय-**

(अ) शासन निर्णयाच्या त्रिभाषा सूत्रानुसार माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यास तीन भाषा विषय असणे अनिवार्य आहे. त्याप्रमाणे प्रथम भाषा, द्वितीय भाषा (संपूर्ण किंवा संयुक्त) व तृतीय भाषा येतात. १०० गुणांच्या भाषा विषयामध्ये १०० गुण लेखी परीक्षा व तर ५० गुणांच्या भाषा विषयासाठी ५० गुण लेखी परीक्षा तर दोन्ही सत्र परीक्षेत स्वतंत्रपणे ५० गुणांचे अंतर्गत मूल्यमापन अशी विभागणी राहील.

(ब) शालेय स्तरावर इयत्ता ९ वी साठी मराठी माध्यमाच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना इंग्रजी (तृतीय)ऐवजी इंग्रजी(प्रथम)भाषा अभ्यासण्याची पर्यायी तरतूद/सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

(क) शालेय स्तरावर इयत्ता ९ वी साठी इंग्रजी माध्यमाच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना मराठी(व्दितीय)ऐवजी मराठी(प्रथम) भाषा अभ्यासण्याची पर्यायी तरतूद /सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.उपरोक्त (अ) आणि (ब) प्रमाणे इंग्रजी प्रथम भाषा व मराठी प्रथम भाषा निवडण्याचे स्वातंत्र्य विद्यार्थ्यांना राहील व त्याची प्रचलित पध्दतीप्रमाणे कार्यवाही सुरु राहील.

२) **गणित भाग१ व भाग२**(बीजगणित व भूमिती):- हा विषय १०० गुणांचा राहील १०० गुणांमध्ये ८० गुण लेखी परीक्षा व २०गुण अंतर्गत मूल्यमापनासाठी राहतील. गणित भाग-१ (बीजगणित) ४० गुण + गणित भाग-२ (भूमिती) ४० गुण याप्रमाणे ८० गुणांची लेखी परीक्षेसाठी विभागणी राहील व २० गुण अंतर्गत मूल्यमापनासाठी राहतील. या विषयासाठी प्रचलित पद्धतीप्रमाणेच २ स्वतंत्र प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका राहतील. **प्रचलित पद्धतीप्रमाणे सामान्यगणित हा पर्यायी स्वतंत्र विषय राहणार नाही. गणित भाग १ व गणित भाग २ अशी पाठयपुस्तके राहतील.**

३) **विज्ञान व तंत्रज्ञान**:- इयत्ता ९ वी विज्ञान व तंत्रज्ञान या विषयाचे पाठयपुस्तक जरी एकच असले तरी त्यात विभाग अ व विभाग ब अशी विभागणी आहे. त्यामुळे प्रश्नपत्रिकेतील लेखी परीक्षेसाठी पेपर१=४० गुण व पेपर२=४० गुण याप्रमाणे दोन स्वतंत्र पेपर व स्वतंत्र उत्तरपत्रिका राहतील. तर ४० गुणांच्या लेखी परीक्षेमध्ये पेपर-१ मध्ये भौतिकशास्त्र व रसायनशास्त्र-मिळून ४० गुण तसेच पेपर-२ मध्ये जीवशास्त्र व विज्ञानाशी संबधित इतर विषय (पर्यावरण, अवकाश हवामान, आपत्ती व्यवस्थापन आणि माहिती संप्रेषण तंत्रज्ञान) असे ४० गुण राहतील. व २० गुण प्रात्यक्षिक परीक्षेस राहतील.

४) **सामाजिकशास्त्रे** :- इतिहास+राज्यशास्त्र या विषयासाठी एक आणि भूगोल या विषयासाठी एक अशी दोन क्रमिक पाठयपुस्तके रहाणार असून, या विषयाच्या गुणांची विभागणी इतिहास-४० गुण + राज्यशास्त्र २० गुण व भूगोल-४० गुण याप्रमाणे लेखी परीक्षेसाठी एकूण १०० गुणांची परीक्षा रहाणार असून इतिहास व राज्यशास्त्र आणि भूगोल अशा दोन स्वतंत्र प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका राहतील.

**५) इ.९वी च्या सर्व विषयासाठी द्वितीय सत्र परीक्षेसाठी प्रथम सत्रातील घटकांवरील २०% प्रश्न असावेत म्हणजे १०० गुणांच्या परीक्षेसाठी ८०% भारांश हा द्वितीय सत्रातील अभ्यासक्रमावर तर २०% भारांश प्रथम सत्रातील अभ्यासक्रमावर असावा व त्याप्रमाणे प्रश्नपत्रिका संपादन व्हावे याची नोंद घ्यावी.**

६) **NSQF चे व्यवसाय विषय** :- NSQF प्रमाणे PSSCIVE ने तयार केलेले व्यवसाय विषय (ट्रेड) केंद्रशासनातर्फे ''राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान'' (RMSA) अंतर्गत शासकीय माध्यमिक शाळांमध्ये सुरु करण्यात आलेले आहेत. त्या विषयासाठी १०० गुण राहतील त्यामध्ये ३० गुण लेखी परीक्षा व ७० गुण प्रात्यक्षिक परीक्षा याप्रमाणे राहतील. सदर विषय माध्यमिक शाळांना परस्पर सुरु करता येणार नाही.

**राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान या अंतर्गत सुरु झालेल्या व्यवसाय अभ्यासक्रमाच्या विषयांच्या खालील (इ ९ वी साठी) यादीतील कोणताही एक विषय शाळांना निवडता येईल.**

१. मल्टी स्किल फाऊंडेशन कोर्स(८१)
२. ऑटोमोबाईल सर्व्हिस टेक्निशियन(८२)
३. रिटेल मर्चंडायझिंग(८३)
४. हेल्थकेअर जनरल ड्यूटी असिस्टंट(८४)
५. ब्युटी अँड वेलनेस (८५)
६. फिजिकल एज्युकेशन अँड स्पोर्टस (८६)
७. टूरिझम अँड ट्रॅव्हल (८७)
८. अॅग्रिकल्चर(८८)
९. मिडिया अँड एन्टरटेनमेंट (८९)
१०. बँकिंग अँड फायनान्शिअल सर्व्हिस (९०)

**प्रचलित पूर्व व्यवसाय अभ्यासक्रम** V1,V2,V3 **या विषयांसाठी खालीलप्रमाणे चार विषय असतील.**

**१) मूलभूत तंत्रज्ञानाची ओळख (IBT) (८१)/ मल्टी स्किल फाऊंडेशन कोर्स (८१)**

**२) मेकॅनिकल टेक्नॉलॉजी(९१)**

**३) इलेक्ट्रिकल टेक्नॉलॉजी(९२)**

**४) इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजी(९३)**

उपरोक्त चार विषयांपैकी कोणताही एक विषय निवडता येईल.या ४ पैकी विषय निवडणाऱ्या विद्यार्थ्यांना वरील NSQF च्या १० विषयातून विषयाची निवड करता येणार नाही. पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाची अंमलबजावणी प्रचलित पध्दतीप्रमाणेच राहील. ज्या शाळांना V1,V2,V3 या व्यवसाय अभ्यासक्रमाची परवानगी आहे, त्यांनाच उपरोक्त विषयातील एका विषयाची निवड इ.९वी करीता शै.वर्ष २०१७-१८ साठी मुख्य विषय म्हणून करावयाची आहे. त्यामुळे शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून इयत्ता ९ वी साठी हे विषय श्रेणी विषय म्हणून राहणार नाहीत. NSQF मधील मल्टी स्कील फाऊंडेशन कोर्स (८१) प्रचलित अभ्यासक्रमातील मूलभूत तंत्रज्ञानाची ओळख(V1) ह्या विषयांचा अभ्यासक्रम जरी सारखा असला तरी NSQF अंतर्गत शाळांना हा विषय' **मल्टी स्कील फाऊंडेशन कोर्स**' म्हणून तर प्रचलित पूर्व व्यवसाय अभ्यासक्रमाच्या शाळांनी'**मूलभूत तंत्रज्ञानाची ओळख**' म्हणूनच घ्यावयाचा आहे. दोन्ही विषयांसाठी सांकेतांक (८१) राहील.

## शालेय विषय(श्रेणी विषय)

**श्रेणी विषयासाठी लेखी परीक्षा राहणार नाही.**

I) **आरोग्य व शारीरिक शिक्षण :-** शारीरिक शिक्षणाचे मूल्यमापन अभ्यासक्रमावर आधारित राहील.

II) **स्व-विकास व कलारसास्वादः-** माध्यमिक स्तरावर "स्व-विकास व कला रसास्वाद" हा श्रेणीविषय २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून सुरु करण्यात आलेला असून या विषयाच्या पाठयपुस्तकात नमूद केलेल्या उपक्रमानुसार क्षमतांचे मूल्यमापन केले जावे.

III) **संरक्षणशास्त्र/एम.सी.सी.(फक्त इ.९वी साठी)/ स्काउ्ट- गाईड/नागरीसंरक्षण व वाहतूक सुरक्षा/ एन.सी.सी./** यापैकी कोणताही एक विषय शाळेने आपल्या सोईनुसार निवडावा संरक्षणशास्त्र या वैकल्पिक स्वरुपातील विषयाच्या अभ्यासक्रमाची व शैक्षणिक साहित्याची या शैक्षणिक वर्षासाठी म्हणजे २०१७-१८ साठी पुनर्रचना करण्यात आली आहे. या विषयाच्या पाठयपुस्तकात नमूद केलेल्या उपक्रमानुसार क्षमतांचे मूल्यमापन करावे. एन.सी.सी.,एम.सी.सी.,नागरी संरक्षण व वाहतूक सुरक्षा व स्काऊट-गाईड या विषयांचे मूल्यमापनही क्षमतांनुसार करण्यात यावे.

**उपरोक्त शालेय विषयातील स्व-विकास व कलारसास्वाद व संरक्षणशास्त्र या विषयांचा अभ्यासक्रम पुनर्रचित करण्यात आलेला असून आरोग्य व शारीरिकशिक्षण, स्काउ्ट-गाईड, एम. सी .सी, (इ.९वी) एन. सी. सी., नागरी संरक्षण व वहातुक सुरक्षा या विषयांचा अभ्यासक्रम प्रचलित राहील याची नोंद घ्यावी.**

# उत्तीर्णतेचे निकष

१) **भाषा विषय:-**३०० गुणांच्या तीन भाषा विषयांचा गट उत्तीर्णतेसाठी एकत्रित असेल.या तीन भाषा विषयांच्या एकत्रित गटामध्ये उत्तीर्णतेसाठी किमान १०५ गुण आवश्यक राहतील आणि त्यापैकी १०० गुणांच्या भाषा विषयामध्ये किमान २५%(म्हणजे १०० पैकी किमान २५ गुण) आणि संयुक्त भाषा विषयाच्या ५० गुणांच्या भाषा विषयात किमान २५%( म्हणजे ५० पैकी किमान १३) गुण आवश्यक राहतील.राष्ट्रीय **माध्यमिक शिक्षा अभियान अंतर्गत सुरु झालेले व्यवसाय विषय हे भाषा विषयाऐवजी घेण्यात आल्यास त्यांना एकत्रित उत्तीर्णतेच्या लाभाची सवलत व्यवसाय अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना देता येणार नाही.** सदर सवलत फक्त तीन भाषा विषय अभ्यासणा-या विद्यार्थ्यांसाठी आहे.

२) **गणित व विज्ञान आणि तंत्रज्ञान** :- प्रचलित पद्धतीप्रमाणे उत्तीर्णतेसाठी गणित व विज्ञान विषयाचा एकत्रित गट असेल. या दोन विषयांच्या एकत्रित गटामध्ये २०० गुणांपैकी उत्तीर्णतेसाठी किमान ७० गुण आवश्यक आहेत व प्रत्येक विषयात किमान २५% म्हणजे विज्ञान विषयात १०० पैकी किमान २५ व गणित विषयात १००पैकी किमान २५ गुण आवश्यक राहतील.

**इयत्ता ९ वी चा वार्षिक निकाल खालीलप्रमाणे तयार करण्यात यावा**

1. **भाषा विषय**

| प्रथम सत्र | व्दितीय सत्र |
|---|---|
| **लेखी परीक्षा** - १०० गुण(वेळ-३ तास) | **लेखी परीक्षा** - १०० गुण(वेळ -३ तास) |
| **अंतर्गत मूल्यमापन** - ५०गुण(खालीलप्रमाणे) | **अंतर्गत मूल्यमापन** - ५०गुण(खालीलप्रमाणे) |
| प्रथम सत्र चाचणी-२०गुण. | द्वितीय सत्र चाचणी-२०गुण. |
| उपयोजित लेखन- १०गुण(सादरीकरण) | उपयोजित लेखन- १०गुण(सादरीकरण) |
| क्षमता मापन- १०गुण | क्षमता मापन- १०गुण |
| उपक्रम- १०गुण | उपक्रम- १०गुण |

**वार्षिक निकाल:** प्रथम सत्र= १०० गुण +व्दितीय सत्र= १०० गुण +१०० अंतर्गत मूल्यमापन (दोन्ही सत्र मिळून)=३००/३ =१०० सरासरी गुण

२. **संयुक्त भाषा विषयासाठी**

| प्रथम सत्र | व्दितीय सत्र |
|---|---|
| **लेखी परीक्षा** - ५० गुण(वेळ-२ तास) | **लेखी परीक्षा** - ५० गुण(वेळ-२ तास) |
| **अंतर्गत मूल्यमापन** - २५गुण(खालीलप्रमाणे) | **अंतर्गत मूल्यमापन** - २५ गुण(खालीलप्रमाणे) |
| प्रथम सत्र चाचणी= १० गुण | प्रथम सत्र चाचणी= १० गुण |
| उपयोजित लेखन- ०५गुण(सादरीकरण) | उपयोजित लेखन ०५गुण(सादरीकरण) |
| क्षमतामापन - ०५गुण | क्षमतामापन - ०५गुण |
| उपक्रम - ०५गुण | उपक्रम - ०५गुण |

**वार्षिक निकाल** : प्रथम सत्र= ५० गुण +व्दितीय सत्र ५० गुण +अंतर्गत मूल्यमापन=५० गुण(दोन्ही सत्र मिळून) १५०/३ = ५० सरासरी गुण याप्रमाणे दोन्ही संयुक्त भाषांसाठी मूल्यमापन राहील.

**टीप- उपयोजित लेखन-**रचना विभागातील रचनांचे प्रत्यक्ष सादरीकरण अपेक्षित असून गटचर्चा,व्यक्तिगत प्रकाराने करून घेणे.वर्गस्तरावर मूल्यमापन व्हावे.उदा.निबंधस्पर्धा,जाहिरात सादरीकरण स्पर्धा इत्यादी.विद्यार्थ्यांसाठी या स्पर्धा पूर्व नियोजित नसाव्यात.

**उपक्रम**-कोणत्याही भाषेचा उददेश साध्य करण्यासाठी सतत केल्या जाणा-या कृतींचा समूह म्हणजे उपक्रम होय.भाषिक ज्ञान वाढवणारे सहज उपलब्ध साहित्यातून करता येणारे अनुभवविश्व वयानुरुप असावेत. पाठाखाली असे योग्य उपक्रम देण्यात आले आहेत ते घेण्यात यावे. उदा.परिपाठाच्या तासाला आठवड्यातील वर्तमानपत्रात आलेल्या मुख्य मुद्याची व बातम्यांची पारदर्शकतेने निवड करुन वाचन करणे.

**क्षमतावाचन**-भाषण, संभाषण क्षमतेकरता कविता, दोहे सादरीकरण स्पर्धेचे आयोजन करण्याकरता गटात चर्चा करणे इत्यादी.

एका सत्रात एकच उपक्रम घेणे अपेक्षित आहे.

### ३. गणित विषय (बीजगणित व भूमिती)

| लेखी परीक्षा(प्रथम सत्र) | लेखी परीक्षा(द्वितीय सत्र) |
|---|---|
| बीजगणित- ४० गुण( वेळ २ तास)<br>भूमिती- ४० गुण(वेळ २ तास)<br>अंतर्गत मूल्यमापन- २० गुण<br>एकूण = १०० गुण | बीजगणित- ४० गुण( वेळ २ तास)<br>भूमिती- ४० गुण( वेळ २ तास)<br>अंतर्गत मूल्यमापन- २० गुण<br>एकूण = १०० गुण |

**अंतर्गत मूल्यमापन(प्रथम सत्र व व्दितीय सत्र स्वतंत्रपणे) :- चाचणी परीक्षा** = १० गुण (प्रथम व व्दितीय सत्रामध्ये ४० गुणांची (२० गुण गणित भाग १ व २० गुण गणित भाग २) चाचणी परीक्षा घेउन त्यांचे १० गुणात रुपांतर करावे).

**प्रात्यक्षिक परीक्षा**= १० गुण (प्रथम व द्वितीय सत्र परीक्षेसाठी गणित भाग १ व गणित भाग २ साठी प्रात्यक्षिक परीक्षा घेऊ न भाग १ साठी ५ गुण व भाग २ साठी ५ गुण या प्रमाणे १० गुण घ्यावेत.) अशाप्रकारे अंतर्गत मूल्यमापनासाठी चाचणी परीक्षा १०गुण+प्रात्यक्षिक परीक्षा १० गुण याप्रमाणे २० गुण अंतर्गत मूल्यमापनासाठी राहतील.

**वार्षिक निकाल:** प्रथम सत्र= १००गुण +व्दितीय सत्र=१००गुण = २०० गुण २००/२ =१०० सरासरी गुण

### ४. विज्ञान आणि तंत्रज्ञान

| प्रथम सत्र | व्दितीय सत्र |
|---|---|
| **लेखी परीक्षा-**<br>पेपर १ - ४० गुण (वेळ २ तास)<br>पेपर २ - ४० गुण (वेळ २ तास)<br>**चाचणी १**= १०गुण<br>(२० गुणांची चाचणी घेऊ न १० गुणात रुपांतर करणे)<br>**प्रात्यक्षिक परीक्षा व उपक्रम** = १० गुण<br>(२० गुणांची प्रात्यक्षिक परीक्षा घेऊन १० गुणात रुपांतर करणे)<br>प्रयोग= १२ गुण<br>(पेपर-१=६गुण+पेपर-२=६गुण)<br>नोंदवही= ४ गुण(पेपर-१=२गुण+पेपर-२=२गुण)<br>उपक्रम नोंदणी = ४ गुण (पेपर-१=२गुण+पेपर२=२गुण)<br>**एकूण - १०० गुण** | **लेखी परीक्षा-**<br>पेपर १ - ४० गुण (वेळ २ तास)<br>पेपर २ - ४० गुण (वेळ २ तास)<br>चाचणी १- १०गुण<br>(२० गुणांची चाचणी घेऊन १० गुणात रुपांतर करणे)<br>**प्रात्यक्षिक परीक्षा व उपक्रम**= १० गुण<br>(२० गुणांची प्रात्यक्षिक परीक्षा घेऊन १० गुणात रुपांतर करणे)<br>प्रयोग= १२ गुण<br>(पेपर-१=६गुण+पेपर-२=६गुण)<br>नोंदवही= ४ गुण(पेपर-१=२गुण+पेपर-२=२गुण)<br>उपक्रम नोंदणी = ४ गुण (पेपर-१=२गुण+पेपर२=२गुण)<br>**एकूण - १०० गुण** |

**अंतिम निकाल(वार्षिक निकाल)प्रथम सत्र १०० गुण+व्दितीय सत्र १०० गुण =२००गुण २००/२=१००सरासरी गुण**

**टीप**- उपक्रम पाठांच्या शेवटी देण्यात आले आहेत.

५.सामाजिकशास्त्रे

| प्रथम सत्र | व्दितीय सत्र |
|---|---|
| लेखी परीक्षा-<br>इतिहास व राज्यशास्त्र- ४०+२०=६० गुण<br>(वेळ २.३० तास)<br>भूगोल - ४०गुण<br>(वेळ २ तास)<br>**एकूण- १०० गुण** | लेखी परीक्षा-<br>इतिहास व राज्यशास्त्र- ४०+२०=६० गुण<br>(वेळ २.३० तास)<br>भूगोल - ४०गुण<br>(वेळ २ तास)<br>**एकूण- १०० गुण** |

सामाजिकशास्त्रे या विषयासाठी प्रचलित मूल्यमापनातील अंतर्गत गुण शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून इ.९ वी साठी राहणार नाहीत.विद्यार्थ्यांची अभ्यासूवृत्ती व गुणवत्ता वाढावी तसेच जिज्ञासा निर्माण व्हावी म्हणून प्रत्येक सत्रात घटक चाचणी अथवा उपक्रम घ्यावेत परंतू त्यांचे गुण सरासरी गुणांसाठी धरण्यात येऊ नयेत. वार्षिक निकाल प्रथम सत्र १०० गुण+व्दितीय सत्र १०० गुण =२०० गुण २००/२=१०० सरासरी गुण

६) NSQF व्यवसाय अभ्यासक्रम-(१०वी च्या) व पूर्व व्यवसाय अभ्यासक्रम -९वी (एकूण ४ विषय) माध्यमिक स्तर-इ.९ वी NSQF विषयांची मूल्यमापन योजना स्वतंत्रपणे यापूर्वीच कळविलेली आहे. इ.९ वी प्रथम व द्वितीय सत्रातील इतर परीक्षा शालेय स्तरावर सरावासाठी घ्याव्यात मात्र NSQF च्या विषयांसाठी इ.९ वी परीक्षा प्रश्नपत्रिका मंडळामार्फत शाळांना पुरवून शालेय स्तरावर परीक्षा व इ.९ वी चा वार्षिक निकाल हा फक्त अंतिम परीक्षेवरच काढण्यात यावा.असे कळविण्यात आलेले होते. परंतु **शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून इ.९ वी परीक्षा हया शालेय स्तरावरच प्रश्नपत्रिका संपादन करुन घ्यावयाच्या आहेत याची नोंद घ्यावी.**तसेच NSQF व पूर्वव्यवसाय अभ्यासक्रम यांच्या विषयाची इयत्ता ९ वी मूल्यमापन योजना खालीलप्रमाणे राहील.

*** प्रथम सत्र**

चाचणी परीक्षा १- २० गुण
प्रात्यक्षिक परीक्षा - ३० गुण
लेखी परीक्षा - ५० गुण (८० गुणांची परीक्षा घेऊन ५० गुणात रूपांतर करणे)
**एकूण - १०० गुण**

*** व्दितीय सत्र**

चाचणी परीक्षा २- ०५ गुण (२० गुणांची परीक्षा घेऊन ०५ गुणात रुपांतर)
लेखी परीक्षा - ३० गुण (८० गुणांची परीक्षा घेऊन ३० गुणात रुपांतर करणे)

**प्रात्यक्षिक परीक्षा- ३० गुण**

टर्म वर्क/जरनल- ०५ गुण
प्रोजेक्ट - १० गुण
तोंडी परीक्षा- १० गुण
प्रत्यक्ष निरीक्षण १० गुण(प्रात्यक्षिक परीक्षा दरम्यान घेतलेली सुरक्षितता व स्वच्छता इ.)
एकूण - - १०० गुण

**वार्षिक निकाल प्रथम सत्र परीक्षा १०० गुण + द्वितीय सत्र परीक्षा १०० गुण**
**एकूण २०० गुण = २००/२ = १००सरासरी गुण**

# शालेय विषय(श्रेणी विषय)

## शालेय श्रेणी अनिवार्य विषयः

७) **आरोग्य व शारीरिक शिक्षण :-** हा शालेय श्रेणीचा अनिवार्य विषय असून या विषयासाठी प्रचलित अभ्यासक्रमानुसार घटक निहाय भारांश देऊन क्षमता निश्चित कराव्यात. लेखी परीक्षा घेऊ नये. निश्चित केलेल्या क्षमतांनुसार प्रथमसत्र व द्वितीयसत्रात स्वतंत्रपणे प्रात्यक्षिक परीक्षा, मैदानी खेळ घेऊन मूल्यमापन करावे.

**वार्षिक निकाल**-प्रथमसत्र १००गुण+द्वितीयसत्र १००गुण=एकूण २००गुण, २००/२=१००सरासरी गुण. सरासरी गुणाचे श्रेणीत रुपांतर करुन ती श्रेणी विद्यार्थ्यांच्या अंतिम गुणपत्रकात दर्शविण्यात यावी.

८)**स्व-विकास व कलारसास्वादः-** पाठयपुस्तकात प्रकरणनिहाय मूल्यमापन आराखडा व निकष दिलेले आहेत त्यानुसार गुणदान करावे. लेखी परीक्षा घेऊ नये.

**वार्षिक निकाल**-प्रथमसत्र ५० गुण+द्वितीयसत्र ५० गुण=एकूण-१००गुण. १०० गुणांचे श्रेणीत रुपांतर करावे. व ती श्रेणी विद्यार्थ्यांच्या अंतिम गुणपत्रकात दर्शविण्यात यावे.

## शालेय श्रेणी वैकल्पिक विषयः

**१)संरक्षणशास्त्र/एम.सी.सी.(फक्त इ.९वीसाठी)/स्काउट-गाईड/नागरीसंरक्षण व वाहतूक सुरक्षा/एन.सी.सी.**

***संरक्षणशास्त्र** - या विषयासाठी लेखी परीक्षा नाही.कार्यपुस्तिकेत दिलेल्या लेखी कामासाठी ४०%भारांश आणि कृती/प्रात्यक्षिक चर्चा, क्षेत्रभेट, भूमिअभिनय, संग्रह यासाठी ६०% भारांश ठेवण्यात आला आहे.

| **प्रथमसत्र** | **द्वितीयसत्र** |
|---|---|
| लेखी काम =४०गुण | लेखी काम =४०गुण |
| उपक्रमातील प्रत्यक्ष सहभाग=६०गुण | उपक्रमातील प्रत्यक्ष सहभाग=६०गुण |
| **एकूण-१००गुण** | **एकूण-१००गुण** |

**वार्षिक निकाल**-प्रथम सत्र =१००गुण+द्वितीय सत्र=१००गुण=२००गुण

सरासरी१००गुण, सरासरी गुणाचे श्रेणीत रुपांतर करावे.व श्रेणी विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकेत दर्शविण्यात यावी

***एम.सी.सी-(इ.९ वी साठी)**वैकल्पिक गटातील शालेय श्रेणीच्या विषयापैकी हा विषय फक्त इ.९वी साठीच राहील. हा विषय विद्यार्थ्यांना ऐच्छिक स्वरुपाचा परंतु माध्यमिक शाळांना मात्र अनिवार्य राहील. संबधित विद्यार्थ्याना महाराष्ट्र छात्रसेना या विषयाचे प्रमाणपत्र शाळेमार्फतच देण्यात येईल. प्रात्यक्षिक व नोंदवहीचे गुण एकत्र करावेत. लेखी परीक्षा घेऊ नये.

**वार्षिक निकाल**-प्रथमसत्र=१००गुण+द्वितीयसत्र=१००गुण=२००गुण

२००गुणांचे १०० गुणात रुपांतर करुन त्यानुसार श्रेणी देण्यात यावी. व विद्यार्थ्याचे अंतिम गुणतक्त्यात श्रेणी दर्शविण्यात यावी.

***स्काऊट गाईड**-स्काऊट गाईड या विषयासाठी महाराष्ट्र स्काऊट गाईड संस्थेने निर्धारित केलेला पाठयक्रम व मूल्यमापन पद्धतीनुसार मूल्यमापन करावे. विद्यार्थ्यांच्या अंतिम निकाल पत्रकात श्रेणी दर्शविण्यात यावी.

***नागरी संरक्षण व वाहतूक सुरक्षा**- या विषयासाठी प्रचलित अभ्यासक्रमानुसार क्षमता निश्चित करतांना विद्यार्थ्याचा वयोगट, पूर्वज्ञान, आकलन क्षमता या बाबींचा विचार करावा लेखन कार्यासाठी स्वतंत्र २०० पानी वही करावी. त्यामध्ये चित्रे, अकृत्या, तात्विक माहिती, नामनिर्देशित आकृत्या, वैशिष्टपूर्ण नोंदी इत्यादीचा समावेश असावा.

| **प्रथमसत्र** | **द्वितीयसत्र** |
|---|---|
| प्रात्यक्षिक परीक्षा =५०गुण | प्रात्यक्षिक परीक्षा =५०गुण |
| नोंदवही =५०गुण | नोंदवही=५०गुण |
| एकूण=१०० गुण | एकूण=१००गूण |

**वार्षिक निकाल**-प्रथमसत्र=१००गुण+द्वितीयसत्र=१००गुण=२००गुण

२००गुणांचे १०० गुणात रुपांतर करुन त्यानुसार श्रेणी देण्यात यावी. व विद्यार्थ्याचे अंतिम गुणतक्त्यात श्रेणी दर्शविण्यात यावी. लेखी परीक्षा घेऊ नये.

***एन.सी.सी**-या विषयाची कार्यवाही केंद्र शासनाने निर्धारित केलेल्या प्रचलित पध्दतीप्रमाणे लागू राहील. विद्यार्थ्याच्या अंतिम निकालपत्रकात श्रेणी दर्शविण्यात यावी.

श्रेणी तक्ता(सर्व श्रेणी विषयांसाठी)

| अ.क्र | मिळालेले गुण(टक्के) | श्रेणी |
|---|---|---|
| १ | ६०%व त्यापेक्षा अधिक | अ |
| २ | ४५%व त्यापेक्षा अधिक परंतु ६०%पेक्षा कमी | ब |
| ३ | ३५%व त्यापेक्षा अधिक परंतु ४५%पेक्षा कमी | क |
| ४ | ३५% पेक्षा कमी गुण | ड |

**उपरोक्त नुसार इयत्ता ९ वी चा वार्षिक निकाल ६०० गुणांचा राहील.**

**विषय योजना व तासिका (इ.९वी) शै.वर्ष २०१७-१८ पासून पुढे**
**परिशिष्ठ - अ**

| अ.क्र. | विषय | तासिका |
|---|---|---|
| १ | प्रथम भाषा | ०६ |
| २ | व्दितीय भाषा किंवा संयुक्त भाषा | ०६ |
| ३ | तृतीय भाषा | ०६ |
| ४ | गणित(बीजगणित+भूमिती) | ०७ |
| ५ | विज्ञान आणि तंत्रज्ञान | ०७ |
| ६ | सामाजिकशास्त्रे<br>(अ) इतिहास व राज्यशास्त्र (०४ तासिका)(ब)भूगोल(०३ तासिका) | ०७ |
| | **शालेय श्रेणी विषय** | |
| ७ | आरोग्य व शारीरिक शिक्षण | ०२ |
| ८ | स्व-विकास व कलारसास्वाद | ०२ |
| ९ | संरक्षणशास्त्र किंवा एम. सी. सी.(फक्त ९ वी साठी)स्काउट-गाईड/नागरी संरक्षण व वाहतूक सुरक्षा/एन. सी. सी. | ०२ |
| | **एकूण** | ४५ |
| १० | **NSQF चे व्यवसाय विषय व पूर्व व्यवसाय विषय** | १२ |

१. पहिली तासिका ४० मिनिटांची राहील, अन्य उर्वरित तासिका ३५ मिनीटांच्या राहतील.

२. प्रार्थना व परिपाठ यांसाठी स्वतंत्र १० मिनिटे राहतील.

३. इ.९वी व इ.१० वी साठी प्रत्येक दिवशी ८ तासिका व शनिवारी ५ तासिका असा एका आठवडयातील अध्यापन कालावधी ४५ तासिका एवढा राहील.

४. NSQF विषय व पूर्व व्यवसाय अभ्यासक्रम ज्या विषयास पर्याय म्हणून निवडले असतील त्या विषयासाठी असणाऱ्या तासिका वेळापत्रकात राहतील व उर्वरित तासिका वेळापत्रकाबाहेर राहतील.

# परिशिष्ट 'ब' मूल्यमापन योजना इ.९वी (शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून पुढे)

| अ क्र. | विषय | लेखी परीक्षा | | | अंतर्गत/ प्रात्यक्षिक परीक्षा | | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रश्नपत्रिका संख्या | गुण | कालावधी तास | गुण | कालावधी तास | |
| १ | प्रथम भाषा | ०१ | १०० | ०३ | - | - | १०० |
| २ | द्वितीय भाषा किंवा संयुक्त भाषा | ०१ | १००<br>५०+५० | ०३<br>२+२ | - | - | १०० |
| ३ | तृतीय भाषा | ०१ | १०० | ०३ | - | - | १०० |
| ४ | गणित (बीजगणित+भूमिती) | ०२ | ४०+४० | ०२ तास प्रत्येकी | २० गुण | - | १०० |
| ५ | विज्ञान आणि तंत्रज्ञान | ०२ | ४०+४० | ०२ तास प्रत्येकी | २० गुण | १.३० तास | १०० |
| ६ | सामाजिकशास्त्रे<br>अ)इतिहास व राज्यशास्त्र<br>ब)भूगोल | ०१<br>०१ | ६० (४०+२०)<br>४० | २.३० तास<br>२ तास | -<br>- | -<br>- | १०० |
| ७ | NSQF व्यवसाय विषय (भाषा व सामाजिक शास्त्रे विषयास पर्याय) | ०१ | ३० (८० गुणांची परीक्षा घेऊन ३० गुणात रुपांतर) | ३ तास | ७० गुण | ३ तास | १०० |
| ८ | आरोग्य व शारीरिक शिक्षण | | | | | | श्रेणी |
| ९ | स्व-विकास व कलारसास्वाद | | | | | | श्रेणी |
| १० | संरक्षणशास्त्र किंवा एम.सी.सी. (९ वी साठी/ स्काऊट गाईड/ नागरी संरक्षण व वाहतूक सुरक्षा/ एन.सी.सी. | | | | | | श्रेणी |
| | एकूण | | | | | | ६०० |

इयत्ता १० वी विषय योजना व तासिका विभागणी फक्त शैक्षणिक वर्ष २०१७-१८ या वर्षासाठीच

| अ.क्र. | विषय | आधीच्या तासिका | प्रस्तावित तासिका |
|---|---|---|---|
| १ | प्रथम भाषा | ०६ | ०६ |
| २ | द्वितीय भाषा किंवा<br>संयुक्त भाषा | ०४ | ०४<br>(२+२) |
| ३ | तृतीय भाषा | ०८ | ०६ |
| ४ | माहिती संप्रेषण तंत्रज्ञान | ०२ | ०२ |
| ५ | गणित (बीजगणित + भूमिती) किंवा<br>सामान्य गणित (अ=भाग १ +ब= भाग २) | ०७ | ०७ |
| ६ | विज्ञान आणि तंत्रज्ञान | ०८ | ०७ |
| ७ | सामाजिकशास्त्रे<br>(अ) इतिहास + राज्यशास्त्र<br>(ब) भूगोल + अर्थशास्त्र | ०६ | ०६<br>(०३)<br>(०३) |
| | **शालेय श्रेणी विषय** | | |
| ८ | आरोग्य व शारीरिक शिक्षण | ०३ | ०२ |
| ९ | व्यक्तिमत्त्व विकास | ०२ | ०२ |
| १० | कार्यशिक्षण/पूर्वव्यावसायिक अभ्यासक्रम | ०२ | ०२ |
| ११ | समाजसेवा/स्काऊट- गाईड/नागरी संरक्षण व वाहतूक सुरक्षा/संरक्षणशास्त्र/एन.सी.सी./व्यवसाय मार्गदर्शन | ०२ | १+१* |
| | **एकूण** | ५० | ४५ + १* |

टीपः- १. पहिली तासिका ४० मिनिटांची राहील, अन्य उर्वरित तासिका ३५ मिनिटांच्या राहतील.

२. प्रार्थना व परिपाठ यांसाठी स्वतंत्र १० मिनिटे राहतील.

३. इ.९वी व इ.१० वी साठी एका आठवडयातील अध्यापन कालावधी ४५ तासिका एवढा राहील.

४. NSQF व पूर्व व्यवसाय अभ्यासक्रम ज्या विषयास पर्याय म्हणून निवडले असतील त्या विषयासाठी असणाऱ्या तासिका वेळापत्रकात राहतील व उर्वरित तासिका वेळापत्रकाबाहेर राहतील.

५. फक्त सन २०१७-१८ या शै.वर्षाकरिता इ.१० वी साठी उपरोक्तप्रमाणे तासिका राहतील. समाजसेवा गटातील विषयांसाठी शाळेने शनिवारी शेवटची तासिका ठेवावी व त्यास जोडून जास्तीची(*) तासिका घ्यावी.

**शैक्षणिक वर्ष २०१७-१८ साठी इ.१०वी प्रचलित मूल्यमापन पध्दतीत कोणताही बदल नाही. याची नोंद घ्यावी.**

वरील सर्व सूचना आपल्या विद्यालयातील सर्व शिक्षक, विद्यार्थी व पालक यांच्या निदर्शनास आणून परिपत्रकानुसार कार्यवाही करण्यात यावी. मंडळाच्या www.mahahsscboard.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर हे परिपत्रक उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.

(कृष्णकुमार पाटील)
**सचिव**
**राज्यमंडळ, पुणे ०४**

**प्रति,**

विभागीय सचिव, सर्व विभागीय मंडळे,
यांना कळविण्यात येते की,उपरोक्त परिपत्रक आपल्या विभागीय मंडळाच्या कक्षेतील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा प्रमुखांना त्वरित पाठविण्याची व्यवस्था करावी.

**प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी:**

१) विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व विभाग.

२) सर्व शिक्षणाधिकारी(माध्यमिक), जिल्हा परिषद,शिक्षण निरीक्षक,बृहन्मुंबई

**प्रत माहितीसाठी सविनय सादर:**

१) मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.

२) मा.शिक्षण आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-१

३) मा.शिक्षण संचालक,(माध्य.व उ.माध्यमिक),महाराष्ट्र राज्य, शिक्षण संचालनालय, पुणे-१

४) मा. संचालक,विद्याप्राधिकरण, सदाशिव पेठ, पुणे-३०

५) मा.संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती, सेनापती बापट मार्ग, पुणे-४११००४